# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/03/2024 (गुरूवार) सकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २५,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०७/०३/२०२४ रोजी ०७.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग व ट्राफिक केसेस करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नीलज फाटा ते भिवापूर रोडने १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-5829 हा येताना दिसला त्याचा पाठलाग करून भिवापूर पोलीस स्टेशन T पॉईंट येथे थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-5829 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. असा एकूण २५,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर टिप्पर **चालक व मालक नामे— प्रमोद बबनराव हटवार, वय ३५ वर्ष, रा. पाचगाव ता. उमरेड** यांचेविरुद्ध कलम ३७९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो.स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, परी. पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, पोलीस हवालदार राकेश त्रिपाठी, पोशि रवि वानखेडे, होम. सैनिक आयुब पठाण यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर